ePaper
# राज ठाकरेंसाठी शिवसेनेचे दरवाजे खुले?: आदित्य ठाकरे



| वर्ष - 7 | अंक - 149 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- इंग्लंडला न्यूझीलंडकडून धोबीपछाड!
- हिना खानला ईडीचा समन्स!
- मणिपूरमध्ये पुन्हा उसळला हिंसाचार!
- नांदेड रुग्णालय 500 खाटांचे करा!


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 6 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बदलत्या सत्ताकारणाने शहरात 'पॉलिटिकल स्पेस'!

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील राजकीय घडामोडी वेगाने बदलत असतानाच शहरात मोठी 'पॉलिटिकल स्पेस' देखील तयार होत आहे. त्याचा फायदा घेत अनेक नवीन नेतृत्व तयार होतील. राष्ट्रवादी, शिवसेनामध्ये अनेक नवीन नेतृत्वांना चांगल्या पदावर काम करण्याची संधी मिळाली असून, शहरातील मुरब्बी, जेष्ठ नेते अद्यापही शांत दिसत आहेत.**




पिंपरी-चिंचवड शहरात राष्ट्रवादीचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खा. शरद पवार असे दोन गट पडल्याने दोन्ही गटात अनेकांना काम करण्याची संधी मिळत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या युवक शहराध्यक्षपदी शेखर काटे या तरुण नेतृत्वाला संधी मिळाली आहे. तर दुसरीकडे खा. शरद पवार गटात शहराध्यक्षपदी माजी नगरसेवक तुषार कामठे यांना अनपेक्षित संधी मिळाली.

राष्ट्रवादी बरोबरच शिवसेनेत देखील हीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे असे दोन गट शहरात पडले आहेत. खा. श्रीरंग बारणे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले.




त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांच्या गटातून मावळ जिल्हाप्रमुखपदी बाळासाहेब वाल्हेकर यांना संधी मिळाली. तर पिंपरी चिंचवड शहराध्यक्षपदी निलेश तरस यांना संधी मिळाली. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या गटातून मावळ जिल्हाप्रमुखपदी माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार यांना संधी मिळाली. एकूणच दोनही पक्षात तयार झालेल्या राजकीय संधीचा फायदा कोण कसा घेणार? हे येणाऱ्या काळात पाहायला मिळणार आहे.

## » जेष्ठ राजकीय नेत्यांच्या भूमिकेकडे लक्ष : नवीन चेहऱ्यांना संधी

### विलास लांडे, राहुल कलाटे यांना संधी...

» राष्ट्रवादीत खा. शरद पवार गटात मोठी राजकीय संधी निर्माण झाली आहे. शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ताकद असली तरी खा. पवार यांना मानणारा मोठा वर्ग आजही कार्यरत आहे. पवारांच्या इशाऱ्यावर हा वर्ग अंतर्गत काम करण्याला सक्रिय होईल असे सांगण्यात येत आहे. सध्याचे शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत हे राजकीय स्पेस निर्माण करत आहेत. मात्र शहर पातळीवर नेतृत्व करण्यासाठी त्यांना मोठी तयारी करावी लागणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडी असा सामना आगामी निवडणुकीत रंगला, तर पिंपरी-चिंचवड शहरात महाविकास आघाडीचा प्रभावी चेहरा नाही. त्या अनुशंगाने शहरात मोठी 'पॉलिटिकल स्पेस' आहे. ही स्पेस भरुन काढण्याची संधी माजी आमदार विलास लांडे, शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे यांना आहे. हे दोन्ही नेते या संधीचा कसा फायदा उठवतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# पुणे मेट्रोकडून "एक पुणे विद्यार्थी पास" कार्डची विद्यार्थ्यांना भेट..!


## » भारतात कुठेही रिटेल पेमेंटसाठी वापरले जाणारे कार्ड भारतीय पेमेंट (RuPay) योजनेवर आधारित

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे मेट्रोने १२ ऑगस्ट २०२३ रोजी 'एक पुणे कार्ड' या पुणे मेट्रोच्या बहुउद्देशीय कार्डचे लोकार्पण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते केले होते. आता दिनांक ६ ऑक्टोबर २०२३ रोजी पुणे मेट्रो विद्यार्थ्यांसाठी "एक पुणे विद्यार्थी पास" या मेट्रो कार्डचे लोकार्पण करणार आहे.**

### "एक पुणे विद्यार्थी पास" ची वैशिष्टे पुढीलप्रमाणे...

पुणे मेट्रोतून दैनंदिन प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रीपेड "एक पुणे विद्यार्थी पास" ची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी HDFC बँकेसोबत भागीदारी केली आहे. कार्डचे नाव "एक पुणे विद्यार्थी पास" असे आहे. आणि ते भारतीय पेमेंट (RUPAY) योजनेवर आधारित आहे. भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, "एक पुणे कार्ड" नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) च्या नियमांचे पालन करते. "एक पुणे विद्यार्थी पास" हे बहुउद्देशीय कार्ड आहे आणि ते मेट्रोच्या प्रवासाबरोबरच भारतात कुठेही रिटेल पेमेंटसाठी वापरले जाऊ शकते. "एक पुणे विद्यार्थी पास" देशातील नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) च्या नियमांचे पालन करते. त्यामुळे भारतातील इतर कोणत्याही मेट्रो आणि बस सेवांमध्ये वापरले जाऊ शकते.




हे एक स्पर्श विरहित (कॉन्टॅक्टलेस) कार्ड आहे, आणि त्यामुळे पेमेंट जलद होते. "एक पुणे विद्यार्थी पास" सर्व मेट्रो स्थानकांवर उपलब्ध आहे. "एक पुणे विद्यार्थी पास" कार्ड घेण्यासाठी १३ वर्षे वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्याखालील वय असणारे विद्यार्थी हे कार्ड घेऊ शकत नाहीत. १३ ते १८ वर्षे वय असणारे विद्यार्थी पॅन कार्ड नसल्यास एक ई-फॉर्म भरून आपले "एक पुणे विद्यार्थी पास" कार्ड प्राप्त करू शकतात. यासाठी आधार कार्डच्या शेवटच्या चार क्रमांकाची आवश्यकता असेल. हे "एक पुणे विद्यार्थी पास" कार्ड घेण्यासाठी महाविद्यालयाचे अधिकृत ओळखपत्र किंवा चालू शैक्षणिक वर्षाचे बोनाफाईड प्रमाणपत्र आवश्यक असेल. हे कार्ड घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला तिकीट दरामध्ये ३०% सवलत लागू करण्यात आली आहे.

### दिवसाच्या 20 व्यवहारांची मर्यादा

» या कार्डची बाकी रचना आणि हे कार्ड प्राप्त करण्याची प्रकिया "एक पुणे कार्ड" प्रमाणे आहे. हे कार्ड सर्व मेट्रो स्थानकांवर उपलब्ध आहे. प्रवासी पुणे मेट्रोच्या संकेत स्थळावर उपलब्ध ई-फॉर्म भरून "एक पुणे विद्यार्थी पास" प्राप्त करू शकतात. या कार्डमध्ये पैसे भरण्यासाठी आपण कोणत्याही ई-वॉलेट, पुणे मेट्रो स्थानकात येऊन किंवा एक पुणे कार्ड संकेतस्थळावरून ऑनलाईन (२००० रु.पर्यंत) अश्या पद्धतीचा वापर करु शकतो. या कार्डद्वारे कोणतेही २००० रुपयांपर्यंतचे व्यवहार सहज करता येऊ शकतात. या कार्डला दिवसाच्या २० व्यवहारांची मर्यादा देण्यात आली आहे.


# मेट्रोमध्ये 'थर्ड रेल सिस्टिम'!

## मेट्रोला रुळांच्या शेजारून केला जाईल विद्युतपुरवठा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीच्या आयटी हबला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या पुणेरी मेट्रोमध्ये अत्याधुनिक 'थर्ड रेल सिस्टिम'चा वापर केला जाणार आहे. 'थर्ड रेल' प्रणालीचा अवलंब केल्यामुळे हिंजवडी ते शिवाजीनगर या २३.३ किलोमीटरच्या मार्गावर मेट्रोला रुळांच्या शेजारून आणि खालून विद्युतपुरवठा केला जाईल.**

या संपूर्ण मार्गावर कुठेही गाडीच्या बाजूने किंवा डोक्यावर इलेक्ट्रिकच्या खांबांचे किंवा तारांचे जाळे दिसून येणार नाही. पुणेरी मेट्रो हा पुणे शहराला अत्याधुनिक अशी 'थर्ड रेल' प्रणाली उपलब्ध करून देणारा पहिला प्रकल्प ठरणार आहे. अखंडित विद्युत पुरवठ्याच्या जोडीला 'थर्ड रेल' प्रणालीचा आणखी एक फायदा म्हणजे मेट्रो गाडीच्या बाजूला किंवा डोक्यावर खांब तसेच विद्युतवाहक तारा नसल्याने दृष्टीसौंदर्यात बाधा येत नाही. पारंपरिक ओव्हरहेड उपकरण प्रणालीपेक्षा हे तंत्रज्ञान वेगळे असून, पक्षी किंवा पतंग तारांमध्ये अडकून मेट्रोच्या विद्युतपुरवठ्याला होऊ शकणाऱ्या संभाव्य अडथळ्याला या प्रणालीमध्ये वाव राहत नाही, अशी माहिती पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आलोक कपूर यांनी दिली. 'थर्ड रेल सिस्टीम'ला लाइव्ह रेल, इलेक्ट्रिक रेल किंवा कंडक्टर रेल असेही म्हटले जाते. ही एक अर्ध-सतत कंडक्टरद्वारे मेट्रो गाडीला विद्युत पुरवठा करण्याची अत्याधुनिक पद्धत आहे. ती मेट्रो रुळावर धावत्या दोन्ही बाजूने समांतर किंवा रुळांच्या मध्ये बसवली जाते. या प्रणालीच्या माध्यमातून संबंधित मेट्रो गाडीला अखंड वीज पुरवठा केला जातो. 'थर्ड रेल' प्रणालीमध्ये मेट्रोच्या नियमित दोन रुळांच्या समांतर तिसरा विशिष्ट पिवळ्या रंगाचे पट्टे मारलेला एकेरी रूळ टाकून, त्या मेट्रो गाडीला थेट खालून 'इलेक्ट्रिक ट्रॅक्शन पॉवर' पुरविली जाते. या पद्धतीने धावणाऱ्या गाड्यांना खालच्या बाजूला विद्युत संपर्कासाठी एक खास धातूची पेटी बसवण्यात येते, तिला 'शूज' असे म्हटले जाते. या शूजच्या माध्यमातून संबंधित मेट्रो गाडीला अखंड वीज पुरवठा होतो.




### यांची होती यावेळी उपस्थिती

» 'थर्ड रेल सिस्टीम'ला लाइव्ह रेल, इलेक्ट्रिक रेल किंवा कंडक्टर रेल असेही म्हटले जाते. ही एक अर्ध-सतत कंडक्टरद्वारे मेट्रो गाडीला विद्युत पुरवठा करण्याची अत्याधुनिक पद्धत आहे. ती मेट्रो रुळावर धावत्या दोन्ही बाजूने समांतर किंवा रुळांच्या मध्ये बसवली जाते. या प्रणालीच्या माध्यमातून संबंधित मेट्रो गाडीला अखंड वीज पुरवठा केला जातो. पुणेरी मेट्रो हा पुणे शहराला अत्याधुनिक अशी 'थर्ड रेल' प्रणाली उपलब्ध करून देणारा पहिला प्रकल्प ठरणार आहे. 'थर्ड रेल' प्रणालीचा आणखी एक फायदा म्हणजे मेट्रो गाडीच्या बाजूला किंवा डोक्यावर खांब तसेच विद्युतवाहक तारा नसल्याने दृष्टीसौंदर्यात बाधा येत नाही. पारंपरिक ओव्हरहेड उपकरण प्रणालीपेक्षा हे तंत्रज्ञान वेगळे असून, पक्षी किंवा पतंग तारांमध्ये अडकून मेट्रोच्या विद्युतपुरवठ्याला होऊ शकणाऱ्या संभाव्य अडथळ्याला या प्रणालीमध्ये वाव राहत नाही, अशी माहिती पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आलोक कपूर यांनी दिली.

# अजितदादांना पालकमंत्री पद दिले, परंतू अधिकार दिलेत का..?

## भाजपने केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी लावावी: तुषार कामठे

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची वर्णी लागली आहे. पिंपरी चिंचवड शहरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडून या निर्णयाचे जोरदार स्वागत केले असताना राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडून मात्र प्रश्न उपस्थित करत जोरदार हल्लाबोल करण्यात आला आहे.**

अजितदादांना पालकमंत्री पद दिले आहे. परंतु त्यांना अधिकार दिले आहेत का? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी उपस्थित केला आहे. जर अजितदादांना अधिकार दिले असतील तर त्यांनी गेल्या पाच वर्षात पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपाने केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी लावावी असे खुले आव्हानच तुषार कामठे यांनी दिले आहे. पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी अजितदादा पवार यांची नियुक्ती झाल्यानंतर पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडून जोरदार जल्लोष करण्यात आला. अजितदादांकडे पालकमंत्री पद आल्यामुळे पिंपरी चिंचवड शहराला त्याचा नक्कीच फायदा होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. मात्र राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडून या नियुक्तीनंतर प्रश्न उपस्थित करत अनेक आरोप देखील करण्यात आले आहेत.

प्रसार माध्यमांशी बोलताना तुषार कामठे म्हणाले की, प्रथमत: अजितदादांना मनापासून शुभेच्छा देतो.. दादांनी जो पदभार घेतलेला आहे, त्याला आम्ही मनापासून शुभेच्छा देतो, अभिनंदन करतो. त्या पदाचा अधिकार अजितदादांना गाजवता यायला पाहिजे. या निर्णयानंतर ज्या पद्धतीने राष्ट्रवादीच्या अजितदादा गटामध्ये आनंद आहे, त्याच पद्धतीने महायुतीमध्ये अत्यंत अस्वस्थता निर्माण झाली आहे. ज्या अजितदादांना पालकमंत्री होण्यासाठी दोन अडीच महिन्याचा कालावधी लागला, जो संघर्ष त्यांच्यामध्ये चालू होता, त्यामध्ये आज दादांना यश आले असेल. पण दादांना कितपत अधिकार भाजपच्या वतीने दिला जाईल?



### ... तर भाजपा उघडे पडू शकते

» जर अजितदादांना अधिकार दिले असतील तर त्यांनी गेल्या पाच वर्षात पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपने केलेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशी लावल्या पाहिजेत. शहराशी संबंधित असलेले प्रलंबित प्रश्न जसे की साडेबारा टक्के परतावा, अनधिकृत बांधकाम, पवना बंद जलवाहिनी, भामा आसखेड असे प्रश्न प्रलंबित आहेत ते मार्गी लावले पाहिजे. तेव्हा आमच्या लक्षात येईल की अजितदादांना पद आणि अधिकार हे दोन्ही दिलेले आहेत. परंतु मी आज ठामपणे सांगू इच्छितो की दादांना भाजपा पद देऊ शकते, मात्र अधिकार देणार नाहीत. कारण अजितदादांना अधिकार दिलेत तर भाजपा उघडे पडू शकते म्हणून भाजपा ती रिस्क घेऊ शकत नाही असे कामठे शेवटी म्हणाले.

# व्यवस्थापन परिषद सदस्यांना वाटले टॅब्लेट

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

कागदाचा वापर कमी करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नव्या व्यवस्थापन परिषद सदस्यांना टॅब्लेट वाटप करण्यात आले आहे. मात्र सदस्यांना टॅब्लेट देऊन कागदांचा वापर खरोखरच कमी होणार का, हा कळीचा प्रश्न आहे. विद्यापीठाच्या मागील व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पहिल्यांदा टॅब्लेट देण्यात आले होते. व्यवस्थापन परिषदेच्या कामकाजात होणारा कागदांचा वापर कमी करण्याचा उद्देश त्यामागे होता. व्यवस्थापन परिषद सदस्यांना दिलेले टॅब्लेट त्यांचा कार्यकाळ संपल्यावर परत घेण्याबाबतचे धोरण विद्यापीठाने निश्चित केले नसल्याचे त्यावेळी समोर आले होते. या मुद्द्यावरून टॅब्लेट वाटपावर आक्षेप घेण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर आता पुन्हा एकदा व्यवस्थापन परिषद सदस्यांना काही दिवसांपूर्वीच नवेकोरे टॅब्लेट देण्यात आले. एका टॅब्लेटची किंमत सुमारे साठ ते सत्तर हजार रुपये असल्याचे सांगण्यात येते. की व्यवस्थापन परिषदेच्या कामकाजात मोठ्या प्रमाणात कागदाचा वापर होतो. आता टॅब्लेटमुळे कागदांचा वापर कमी करून तो बंद करणे अपेक्षित आहे. टॅब्लेटचा योग्य पद्धतीने वापर केल्यास कागदांवरील खर्चही कमी होऊ शकतो. टॅब्लेट ही विद्यापीठाची मालमत्ता असल्याची जाणीव आहे. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपल्यावर टॅब्लेट विद्यापीठाला परत केला जाईल किंवा कोणाला टॅब्लेट स्वतःसाठी हवा असल्यास त्याची मूल्यांकनानुसार विद्यापीठाला रक्कम द्यावी लागेल. या पूर्वीच्या व्यवस्थापन परिषदेच्या कार्यकाळ संपलेल्या सदस्यांनी त्यांना दिलेले टॅब्लेट परत केले किंवा त्याची रक्कम विद्यापीठाकडे भरली. आता कागदविरहित आणि गतिमान कामकाजासाठी नव्या व्यवस्थापन परिषद सदस्यांसाठी विद्यापीठाने टॅब्लेट घेतले असून, कामाच्या गरजेनुसार काही सदस्यांना ते वापरासाठी देण्यात आले.

# महावितरणच्या धोकादायक वीज वाहिन्या भूमिगत होणार!

## आ. महेश लांडगे यांचा पुढाकार, तळवडे, रुपीनगरमधील रहिवाशांना दिलासा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उघड्यावरील उच्चदाब आणि लघुदाब वीजवाहिन्यांमुळे रुपीनगर, तळवडे भागात शॉर्ट सर्किट अथवा नागरिकांचा स्पर्श झाल्यामुळे अपघाताच्या घटना समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर या परिसरातील वीज वाहिन्या भूमिगत करण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. त्यानुसार, वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे काम सुरू झाले आहे.**



उघड्यावरील वीजवाहिन्यांमुळे रहिवाशांच्या जीवितास धोका आहे. त्यामुळे माजी नगरसेवक शांतराम भालेकर आणि सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. अशा घटना पुन्हा घडू नयेत. या करिता आमदार महेश लांडगे यांनी लक्ष घालावे, अशी मागणी केली होती. याची तात्काळ दखल घेत महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेण्यात आली. त्यानंतर दोनच दिवसांत वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे काम सुरू करण्यात आले. माजी नगरसेवक शांताराम भालेकर, माजी स्वीकृत नगरसेवक पांडुरंग भालेकर, रमेश भालेकर, सोमनाथ मेमाणे, भाऊसाहेब काळोखे, सामाजिक कार्यकर्ते संदीप जाधव, अस्मिता भालेकर, शिरीष उत्तेकर, राहुल पिंगळे, रवी शेतसंधी आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, भोसरी विधानसभा मतदार संघातील तळवडे येथे विविध गृहनिर्माण सोसायटी, रुपीनगर येथील हनुमान मंदिर ते काळे महाराज मंदिर दरम्यान महावितरणच्या उच्चदाब व लघुदाब वाहिन्या भूमिगत करण्याचे काम हाती घेण्यात आले. वीजवाहिन्या उघड्यावर असल्यामुळे शॉर्ट सर्किट होवून एका मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. स्थानिक नागरिकांमध्ये वीज वाहिन्यांमुळे भीतीचे वातावरण होते. त्यामुळे महावितरण प्रशासनाने तात्काळ काम हाती घ्यावे, अशी सूचना केली होती.

> “महावितरण प्रशासनाकडून आज वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे काम सुरू करण्यात आले. स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने आगामी काळात मतदार संघातील सर्वच वीजवाहिन्या भूमिगत करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेबाबत आम्ही सतर्क आहोत.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

---

## खासदार संजय सिंह यांच्या अटकेच्या विरोधात पिंपरीत आम आदमी पार्टी तर्फे निदर्शने

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर ठिय्या आंदोलन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिल्लीमध्ये घडलेल्या घटनाक्रमानुसार आम आदमी पार्टीचे राज्यसभेचे खासदार संजय सिंह आणि काही पत्रकारांना दिल्लीमध्ये अटक करण्यात आली. भाजपा आणि मोदी सरकारच्या चुकीच्या धोरणांविरोधात प्रखरतेने आवाज उठवणारे पत्रकार आणि विरोधकांवर ईडी, सीबीआय, आणि पोलीस यंत्रणा मार्फत त्रास दिला जात आहे. कालच्या अटकसत्रानंतर सरकारने देशामध्ये आणीबाणी लागू केली असल्याच्या चर्चेवर शिक्कामोर्तब केले असून त्याचा विरोध करण्याकरीता आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत असे सांगण्यात आले.**




आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत संजय सिंह यांच्यावरील कारवाईचा निषेध केला. यावेळी आपचे शहराध्यक्ष चेतन बेंद्रे, ब्रह्मानंद जाधव, सुरेश भिसे, अभिजीत सूर्यवंशी, संतोष इंगळे,सचिन पवार, वैजनाथ शिरसाठ, गोविंद माळी, अजय सिंग,प्रकाश हागवणे, कमलेश रणवरे, रोहित सरनोबत, इमरान खान, प्रदीप सूर्यवंशी, सुरेंद्र कांबळे, शुभम यादव, संजीव झोपे, स्मिता पवार, सरोज कदम, सुरेश बावनकर, यल्लाप्पा वालदोर, रफिक अत्तार, दमयंती नेरकर, कल्याणी राऊत, चंद्रमणी जावळे, सीमा बावनकर, प्रशांत कोळवले, संजीव झोपे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## शासकीय वसतीगृहाच्या छताचा भाग कोसळून विद्यार्थिनी जखमी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

छताचा भाग कोसळून विद्यार्थिनी जखमी झाली. ही घटना गुरुवारी (दि. 5) सायंकाळी सव्वासहा वाजताच्या सुमारास वाकड येथे घडली.

अग्निशामक दलाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कावेरीनगर, वाकड येथे आदीवासी मुलींचे वसतीगृह आहे. या वसतीगृहातील चौथ्या मजल्यावरील खोली क्रमांक 27 मधील छताच्या थोडासा भाग (ढपली) पडला.

यावेळी तिथे उभ्या असलेल्या अनिता गेणू पथवे हिच्या डोक्यावर तो भाग कोसळला. त्यामुळे तिच्या कपाळाला दोन टाके पडले आहेत.



याबाबत अग्निशामक दलास सायंकाळी सव्वासहा वाजताच्या सुमारास माहिती मिळाली असता रहाटणी अग्निशामक उपकेंद्रातील बंब घटनास्थळी दाखल झाला. उपचारानंतर अनिता या आपल्या बहिणीकडे भोसरी येथे गेल्या.




**धर्म आणि धार्मिक विचारांतून प्रेरणा मिळालेल्या घटना आपल्या सभोवताली नियमितपणे घडताना दिसत आहेत. नेमक्या त्याच घटनांकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष वेधण्यात राजकारणी आणि माध्यमे यशस्वी झाली आहेत. खलिस्तान समर्थक कॅनडास्थित हरदीप सिंह निज्जर यांचा खून झाला. खलिस्तानला समर्थन म्हणजे स्वतंत्र शीख धर्मीय राष्ट्राला समर्थन.**

# धार्मिक प्रभाव हे धर्मनिरपेक्षतेचे उल्लंघनच!

दुसरी घटना म्हणजे, तामिळनाडूचे राजकीय नेते उदयनिधी यांनी सनातन धर्माबद्दल काढलेले उद्गार. यावर सत्ताधारी आणि विरोधक आपापले राजकारण करत आहेत आणि, तिसरी घटना म्हणजे, महिला-आरक्षणाबाबतचे विधेयक. महिलांना दुय्यम स्थान देण्याची मानसिकता धार्मिक विचारांतूनच आलेली असते. निसर्गतः लोकसंख्येत ५० टक्के असणाऱ्या महिलांना 'आम्ही आरक्षण देत आहोत' असे म्हणणे ही पश्चातबुद्धी होय. खलिस्तान समर्थन असो; सनातन धर्माबद्दल काढलेले उद्गार असो किंवा महिलांना समान हक्क/संधी देण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून चर्चेत आलेले महिला आरक्षण विधेयक असो; अंतिमतः या सर्वांची प्रेरणा 'धर्म' हीच आहे. गेल्या महिन्यातील या घटनांच्या गदारोळाच्या व नुकत्याच संपलेल्या गणेशोत्सवातील उत्सवी वातावरणाच्या तुलनेत, बातमीमूल्य



कमी असल्यामुळेही असेल कदाचित, पण माध्यमांचे आणि पर्यायाने सर्वसामान्य नागरिकांचे एका घटनेकडे दुर्लक्ष झाले. ती म्हणजे, सांगलीत १६ आणि १७ सप्टेंबर रोजी झालेली नास्तिक परिषद. सध्याच्या गडद आणि कर्कश धार्मिक वातावरणात काही बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकवादी नागरिक 'ब्राईट्स सोसायटी' या नास्तिकांच्या संघटनेच्या माध्यमातून एकत्र येतात आणि देव-धर्म नाकारून नास्तिक परिषद घडवून आणतात, हे चित्र खरोखरच आशादायी आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. विवेकवादी विचार, लोकशाही मूल्ये आणि प्रशासनाची प्राथमिकता या विषयांवर दिशादर्शक संवाद साधण्याचा प्रयत्न परिषदेत करण्यात आला. प्रख्यात लेखक, कवी जावेद अख्तर, तुषार गांधी आणि संपादक व खासदार कुमार केतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या परिषदेत अनेक विषयांवर व्याख्याने, चर्चा व परिसंवाद झाले. उपस्थितांच्या प्रश्नोत्तरांना सर्वच पाहुण्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. संपूर्ण परिषदेचे सूत्रसंचालन डॉ. शंतनू अभ्यंकर यांनी केले. सामाजिक कार्यकर्ते विश्वांभर चौधरी आणि ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. असीम सरोदे यांनी विचार मांडले. 'धर्माचा वापर द्वेष पसरवण्यासाठीच होत आहे'. 'लोकशाहीमध्ये बहुसंख्याकवाद घातकच असतो,' 'राजकारणापासून कुठलाही समाज मुक्त राहिलेला नाही,' 'नास्तिकतेचे सामर्थ्य आणि मर्यादा' अशा विषयांवर सर्व प्रमुख वक्त्यांनी विचार मांडले. जावेद अख्तर यांनी दोन दिवस विविध विषयांसाठी पूर्ण वेळ देऊन उपस्थितांची मने जिंकली. परिषदेत सादर केल्या गेलेल्या एकांकिकेच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे एक नवीन प्रभावी हत्यार मिळाले. परिषद न होऊ देण्यासंदर्भात आयोजकांना धमकीवजा इशाऱ्याचे आलेले कॉल आहे होते. ते वगळता, बाकी एकूण परिषद यशस्वीरित्या पार पडली. उपस्थितांशी झालेल्या चर्चेत काही प्रश्न समोर आले. प्रश्न नेहमीचेच आहेत आणि वारंवार समोर येतात, उदा. नास्तिकांच्या संघटनेची आवश्यकता आहे का? ब्राईट्स सोसायटीच्या माध्यमातून नास्तिकतेचा प्रचार प्रसार केला जात आहे का? नास्तिकता लोकप्रिय का नाही? या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा हा प्रयत्न आहे. 'नास्तिक' कायम आणि प्रत्येकच बाबीत गंभीर असतात. त्यांना आयुष्य उपभोगता येत नाही. नास्तिकांचे आयुष्य निरस, बेचव असते, असे काही समज दिसतात. नास्तिकांबद्दलचा हा समज चुकीचा आहे. लेखन, नाट्य, संगीत, काव्य ते उत्तम व्यवसाय, खेळ, कौटुंबिक संबंध, खानपान अशा सर्वच क्षेत्रांत नास्तिकांचा पुढाकार आहे. ते आपापल्या क्षेत्रांत यशस्वीसुद्धा आहेत. पण, 'द्या उदाहरणं, सांगा त्यांची नावं,' असे कुणी म्हटले, की थोडी पंचाईत होते. कारण अनेकजण, आपण नास्तिक असल्याचे सार्वजनिक रित्या जाहीर करत नाहीत. ही तक्रार नाही किंवा आक्षेपसुद्धा नाही. ज्यांना ज्यांना आपली नास्तिकता जाहीरपणे मांडायची आहे, त्यांच्यासाठी 'ब्राईट्स सोसायटी'चे व्यासपीठ सदैव उपलब्ध आहे. याचा अर्थ असा अजिबात नाही की ब्राईट्स सोसायटी नास्तिकतेचा प्रचार, प्रसार करीत आहे. नास्तिक होणे ही चिरंतन प्रक्रिया आहे, ती विचारांती होत असते, ही प्रक्रिया संपूर्णतः वैयक्तिक आहे.

## संपादकीय »

### स्वच्छतादूत..!

***देशभर नुकताच स्वच्छतेचा फार मोठा उपक्रम हाती घेण्यात आला. महानगरे आणि महानगरपालिका सोडल्यास, सर्वत्र या स्वच्छतादूतांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, असे दिसते.***

तो स्वच्छतादूत म्हणजे नागरी आणि ग्रामीण भागात मुक्तसंचार असणारी डुकरे होत. वन्यजीव सप्ताह साजरा करताना, या आधुनिक स्वच्छतादूताविषयी माहिती करून घेऊयात. आमच्या मनात प्रश्न पडतो की, बा डुकरा, तू नसतास तर? हा विचारच करवत नाही. तुझे या भारत देशावर अनंत उपकार आहेत. डुक्कर या प्राण्याची निर्मिती करणाऱ्या सर्वसत्ताधीश परमेश्वराला प्रणाम. भारतामधील वाढणारी लोकसंख्या तुझ्या आरोग्याला पोषक अशी गलिच्छ व्यवस्था निर्माण करते म्हणून तूही तुझा वंश वाढविण्याच्या प्रक्रियेला गती दिलीस. शहरे बकाल झाली, खेडी अस्वच्छ झाली, याचा तुझ्याएवढा आनंद अन्य कोणत्या प्राण्याला झाला नसेल. सारा देश स्वच्छ असता, नगर परिषदांनी कचरा तत्काळ उचलला असता, कुठेही घाण राहिली नसती तर तू उपाशी मेला असतास.

**रमेश यांना बरं वाटू लागल्यावर नातेवाईकांनी त्यांना घरी सोडावं अशी विनंती केली. रुग्णालयाने पाच दिवसांचं एकूण अडीच लाखांचं बिल त्यांच्या हातात ठेवलं. आतापर्यंत दीड लाख रुपये भरले होते. उरलेले एक लाखाचं बिल भरल्याशिवाय रुग्णाला सोडता येणार नाही, असं रुग्णालयाने सांगितले. बिलाबाबत विचारणा केल्यावर तपासण्यांचे अहवाल आणि सविस्तर बिल देण्यास रुग्णालयाने स्पष्ट नकार दिला.**

# रुग्णालयांना 'कायद्या'चे इंजेक्शन

रुग्णाला घरी न सोडता अडवून ठेवलं. त्या रात्री नऊच्या सुमारास रुग्ण हक्कासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्याने रुग्णालयामध्ये फोन केला. आणि कायद्यानुसार रमेश यांचे सविस्तर बिल आणि रुग्णालयाच्या दरपत्रकाची मागणी केली. या परिस्थितीचे गांभीर्य रुग्णालयाने ओळखलं आणि तातडीने उरलेले एक लाख रुपये न घेता रमेश यांना घरी सोडलं. खरंतर रुग्णालयामध्ये दाखल झालेल्या प्रत्येक रुग्णाला त्याच्या आजाराची सर्व माहिती, अहवाल आणि सविस्तर बिल (ITEMIZED BILL) मिळायला हवे. 'महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट'च्या सुधारित नियमानुसार हे बंधनकारक आहे. कोविड काळात शासकीय आरोग्य यंत्रणेबरोबरच खासगी आरोग्य यंत्रणेने महत्त्वाची भूमिका निभावली. डॉक्टर्स, नर्सेस, आरोग्य कर्मचारी या सर्वांनी जीव धोक्यात घालून कोविड साथीविरोधात बाजी मारली. आपल्या कोविड पीडित माणसाला वाचवण्यासाठी नातेवाईकांनी



सर्वस्व पणाला लावून प्रयत्न केले. उधारी घेतली, कर्ज घतले, दागिने, जनावरे, शेती, जमीन, घरं विकून दवाखान्यांवर प्रचंड पैसा ओतला. अनेक रुग्णालयांनी अवाच्या सवा बिले लावली. लोकांच्या भावनिक स्थितीचा फायदा घेत काही औषधांसाठी जास्तीचे पैसे घेतले.

पण लोकांसमोर पर्याय नव्हता. त्यांचा एकमेव उद्देश होता, आपला माणूस जगला पाहिजे! याच पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य शासनाने 'महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्टच्या नियमांमध्ये १४ जानेवारी २०२१ रोजी सुधारणा केल्या. खासगी रुग्णालयामधून रुग्णांच्या हक्कांचे उल्लंघन टाळण्यासाठी आणि रुग्णांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी तीन महत्त्वाच्या तरतुदी केल्या. यात प्रत्येक रुग्णालयाने 'रुग्ण हक्क सनदे'ची अंमलबजावणी करणे, 'दरपत्रक' दर्शनी भागात प्रदर्शित करणे. यासोबतच संबंधित प्रशासनाने 'तक्रार निवारण कक्षा'ची स्थापना करून त्याची 'टोल फ्री नंबर'सह माहिती प्रदर्शित करणे कायद्याने बंधनकारक आहे. केंद्र शासनाने २ जून २०१९ रोजीच्या व राज्य शासनाने दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या पत्राद्वारे, सर्व हॉस्पिटलमध्ये 'रुग्ण हक्क सनद' लागू करण्याचे आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. उपचार घेणाऱ्या रुग्णाचेही काही हक्क आहेत, उपचार घेत असलेल्या डॉक्टरांव्यतिरिक्त दुसऱ्या डॉक्टरांचे मत (सेकंड ओपिनयन) घेता येते; दाखल रुग्णाला त्याचे केसपेपर, रुग्णांच्या नोंदी, तपासण्यांचे अहवाल आणि तपशीलवार बिल मिळणे; कोणत्याही कारणाने उपचारात भेदभाव न करणे; गंभीर रुग्णाला प्राधान्याने तातडीच्या जीवन रक्षणाच्या सेवा मिळणे या हक्कांविषयी माहिती नसते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# नांदेड रुग्णालय 500 खाटांचे करा!

## » अशोक चव्हाणांनी केली मुख्यमंत्री शिंदेकडे मागणी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाढत्या रुग्णसंख्येचा ताण कमी करण्यासाठी नांदेडच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून त्याची क्षमता 100 खाटांवरुन 300 खाटा करण्याच्या महाविकास आघाडी सरकारच्या निर्णयाचा विस्तार करून या रुग्णालयाची क्षमता 500 खाटांची करण्याची मागणी अशोक चव्हाण यांनी केली.**

दरम्यान, आज झालेल्या राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सकांच्या ऑनलाईन बैठकीत मुख्यमंत्र्यांनी नांदेड येथे 500 खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्याबाबत उद्या सकाळी 11 वाजेपर्यंत प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भातील माहिती अशोक चव्हाण यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली. आरोग्य सेवा सुधारण्याकरिता तात्कालिक व दीर्घकालीन अशा दुहेरी उपाययोजनांची गरज आहे. 500 खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारणे हा दीर्घकालीन उपाय आहे. सोबतच आरोग्य सेवेसाठी आवश्यक मनुष्यबळ, निधी, उपकरणे व औषधांची पुरेशी उपलब्धता आदी तातडीच्या उपाययोजनांवर देखील राज्य सरकारने लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी केली.



शासकीय रुग्णालयात गेल्या तीन दिवसांपासून आरोग्य सुविधा कोलमडल्याने व औषधांचा साठा उपलब्ध नसल्याने रुग्णांचा मृत्यू मोठ्या प्रमाणात होत आहे. तीन दिवसात रुग्ण मृत्यूंचा आकडा हा 50 च्या जवळपास पोहोचला. तर दोन दिवसांपूर्वी चोवीस तासात चोवीस जणांचा मृत्यू झाला होता. यात लहान बालकांचा मोठा समावेश असल्याने राज्यात यावरुन राजकारण तापले.

### अधिकाऱ्यांना मागितला प्रस्ताव

» राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सकांच्या ऑनलाईन बैठकीत मुख्यमंत्र्यांनी नांदेड येथे 500 खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्याबाबत उद्या सकाळी 11 वाजेपर्यंत प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भातील माहिती अशोक चव्हाण यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली. आरोग्य सेवा सुधारण्याकरिता तात्कालिक व दीर्घकालीन अशा दुहेरी उपाययोजनांची गरज आहे. 500 खाटांचे जिल्हा सामान्य रुग्णालय उभारणे हा दीर्घकालीन उपाय आहे. सोबतच आरोग्य सेवेसाठी आवश्यक मनुष्यबळ, निधी, उपकरणे व औषधांची पुरेशी उपलब्धता आदी तातडीच्या उपाययोजनांवर देखील राज्य सरकारने लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी केली.

तर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले होते. तर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी देखील सरकारला धारेवर धरले होते. नांदेडमधील जिल्हा रुग्णालयाची क्षमता वाढवली पाहिजे, कर्मचारी भरती झाली पाहिजे यासह अन्य मागण्या त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केल्या.

# सरकारविरुद्ध लिहिणे-बोलणे हा देशद्रोह!

## » उद्धव ठाकरे गटाचा मोदी सरकारवर निशाणा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सरकारी यंत्रणांचा गैरवापर विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी करावा ही काही लोकशाही नाही. केंद्र सरकारने पत्रकारांवरील कारवाईचे समर्थन केले. तसे असेल तर भाजपने आणीबाणीचा निषेध करणे सोडले पाहिजे. तपास यंत्रणा स्वायत्त आणि स्वतंत्र असून आपले कायदेशीर कर्तव्य बजावीत आहेत, असे केंद्रीय प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर म्हणतात. तपास यंत्रणा स्वायत्त की सरकारच्या गुलाम हे संपूर्ण देश जाणतोय. अशा शब्दात उद्धव ठाकरे यांच्या गटाने केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर टीका केली आहे.**

‘ईडी’सारख्या तपास यंत्रणांना सर्वोच्च न्यायालयाने बजावले आहे की, “निष्पक्ष रहा, सूडाने कारवाया करू नका.” यातच सर्व आले. पत्रकारांवरील धाडी व कारवाया हे यंत्रणा निष्पक्ष असल्याचे लक्षण नसून सरकार घाबरले असल्याचे लक्षण असल्याचेही उद्धव ठाकरे गटाने सामना मधून म्हटले आहे. पंतप्रधान मोदी व त्यांच्या भाजपविरुद्ध बोलणाऱ्या आणि लिहिणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांवर मंगळवारी दिल्ली येथे धाडी पडल्या. ‘न्यूज क्लिक’ या वृत्त संकेतस्थळाचे संस्थापक संपादक प्रबीर पुरकायस्थ यांना तर अटक केली गेली. चीनधार्जिणा दुष्प्रचार चालविण्यासाठी बेकायदा आर्थिक मदत घेतल्याचा आरोप त्यांच्यावर असून ‘यूएपीए’ म्हणजे बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मंगळवारी मध्यरात्री 2 वाजल्यापासून या धाडी सुरू झाल्या. दहशतवाद्यांच्या अड्ड्यात घुसून ‘कोम्बिंग’ ऑपरेशन करावे तशा पद्धतीने पोलिसांची पथके पत्रकारांच्या घरात घुसली. लेखिका गीता हरिहरन, अभिसार शर्मा, भाषा सिंह, उर्मिलेश, अनिंदो चक्रवर्ती, इतिहासकार सोहेल हाशमी, व्यंगचित्रकार संजय राजौरा, इरफान खान, स्तंभलेखिका अनुराधा रमन, सत्यम तिवारी अशा अनेक पत्रकारांवर छापे टाकून त्यांचे फोन, लॅपटॉप आदी साहित्य जप्त केले. कम्युनिस्ट नेते सीताराम येचुरी यांच्या घरीही पोलीस पोहोचले. येचुरी यांचे स्वीय सहाय्यक नारायणन यांचे चिरंजीव सुमित ‘न्यूज क्लिक’मध्ये कामाला आहेत. त्यामुळे येचुरी यांच्या घरावर छापे पडले. आणीबाणीत व्यक्तिस्वातंत्र्य, वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी झाली, असे बोंबलणाऱ्यांच्या राज्यात वृत्तपत्र स्वातंत्र्य वधस्तंभावर चढवले असेच म्हणावे लागेल. आणीबाणीत सेन्सॉरशिप होती. आता सरकारविरुद्ध लिहिणे-बोलणे हा देशद्रोह, दहशतवादासारखा गुन्हा ठरला आहे.



### पत्रकारांवर धाडी घातल्या

» रामलीला मैदानावर जनसागर उसळला, पण या जनसागराचे म्हणणे काय? ते काही भाजपची चमचेगिरी करणाऱ्या मीडियाने दाखवले नाही. अशा ‘गोदी’ मीडियाला समांतर असा बाणेदार मीडिया समाजमाध्यमातून उभा राहिला. त्यास लोकांनी पाठिंबा दिला तेव्हा सरकारला मिरच्या झोंबल्या. सरकार इतके घाबरले की, त्यांनी अशा पत्रकारांवर धाडी घातल्या. ‘प्रेस फ्रीडम इंडेक्स’मध्ये भारत जागतिक यादीत शेवटून विसाव्या क्रमांकावर लुढकला आहे.

# मुलांच्या मृत्यूला खासगी रुग्णालये जबाबदार ?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

खासगी दवाखान्यात 5 दिवस सुट्ट्या असल्यामुळे या रुग्णालयांनी लहान मुलांना सरकारी रुग्णालयात शिफ्टी करायला लावले. या सर्व शिफ्टींगमुळे लहान मुलांचा मृत्यू झाला असल्याचा गंभीर आरोप मंत्री हसन मुश्रीफ यांनी केला आहे. त्यामुळे नांदेडमधील बालकांच्या मृत्यूला खासगी रुग्णालयेच जबाबदार असल्याचा आरोप मुश्रीफ यांनी केला आहे. नांदेडच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात चोवीस तासांत झालेल्या नवजात बाळांच्या मृत्यूप्रकरणी वैद्यकीय शिक्षण आणि विशेष सहाय्य मंत्री हसन मुश्रीफ यांनी खासगी रुग्णालयांना जबाबदार धरले आहे. दरम्यान नांदेड मृत्यूप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्यात फोनवरुन चर्चा झाली. यावेळी झालेल्या चर्चेचा तपशील आता समोर आला आहे. या प्रकरणात चौकशी समिती नेमली असून काही महत्वाचे कठोर निर्णय घेतले जाणार असल्याची माहिती देखील मुश्रीफ यांनी दिली आहे. सरकारी रुग्णालयातील स्वच्छता आणि डॉक्टरांच्या बदल्यांबाबत सरकार निर्णय घेत असल्याची माहिती देखील मुश्रीफ यांनी दिली. नांदेड दुर्घटनेप्रकरणी हायकोर्टात दाखल याचिकेवर उद्या राज्य सरकारकडून उत्तर दाखल करण्यात येणार आहे. या घटनेत 10 लहान मुलांचे मृत्यू झाले होते. या मृत्यूला खासगी दवाखाने जबाबदार असल्याचे मुश्रीफ यांनी म्हटले आहे. खासगी दवाखान्यात 5 दिवस सुट्ट्या असल्यामुळे या खासगी रुग्णालयांनी अत्यवस्थ लहान मुलांना सरकारी दवाखान्यात दाखल करायला सांगितले होते, असे हसन मुश्रीफ यांनी सांगितले आहे. दुसरीकडे, नांदेडच्या विष्णुपुरी येथील डॉ शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील मृत्युचे सत्र थांबता थांबेना झाले आहे. मागील 24 तासांत आणखी 14 जणांचा उपचार दरम्यान मृत्यू झाला आहे. त्यामुळे 4 दिवसांत मृत्यूचे अर्धशतक झाले आहे. 2 ऑक्टोबर गांधी जयंती दिनी शासकीय रुग्णालयात मृत्यूचे तांडव सुरू होते.

# गेहलोतजींनी आराम करावा : मोदी

## » जोधपूरमध्ये 12 हजार कोटींच्या प्रकल्पांचे केले उद्घाटन

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 5 ऑक्टोबर रोजी राजस्थान आणि मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. दुपारी ते जबलपूरला पोहोचले, जिथे ते 12,600 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. गोंडवानाच्या वीर राणी दुर्गावती यांच्या 500व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमातही ते सहभागी होणार आहेत.**

याआधी ते राजस्थानमधील जोधपूरला पोहोचले, जिथे सरकारी कार्यक्रमात उपस्थित नसल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री गेहलोत यांची खरडपट्टी काढली आणि म्हणाले- मी एका सरकारी कार्यक्रमातून येतोय, पण मुख्यमंत्री (अशोक गेहलोत) तिथून गायब होते. कारण त्यांचा मोदींवर इतका विश्वास आहे की मोदी आले तर सर्व काही ठीक होईल. मी त्यांनाही सांगतो की, आता तुम्ही आराम करा, आम्ही काळजी घेऊ. 480 कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या जोधपूरमधील विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पंतप्रधानांनी पायाभरणी केली. तसेच जोधपूर आयआयटी देशाला समर्पित केली. यावेळी सुमारे 5 हजार कोटी रुपयांच्या आरोग्य, शिक्षण, रेल्वे आणि रस्ते या प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले. काँग्रेसच्या चुकीच्या कारभारामुळे राजस्थानमध्ये गुन्हे वाढले: केंद्र सरकार राजस्थानच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. पण 5 वर्षांत काँग्रेसच्या चुकीच्या कारभाराने राजस्थानला दंगली, दलित, महिलांविरुद्धचे गुन्हे आणि भ्रष्टाचारात आघाडीवर नेले. राजस्थान लुटण्यासाठी आणि उद्ध्वस्त करण्यासाठी तुम्ही काँग्रेसला मतदान केले होते का? भाजप सरकार राजस्थानला पर्यटनात नंबर वन करणार : राजस्थानला पर्यटनात नंबर वन राज्य करण्याचा भाजपचा संकल्प आहे. ते होईल की नाही, कोण करू शकेल? तुमचे उत्तर चुकीचे आहे. मोदी ते करू शकत नाहीत. हे तुमचे एक मत होऊ शकते. तुमच्या मताच्या बळावर राजस्थानमध्ये भाजपचे सरकार स्थापन होईल आणि राजस्थान पर्यटनात नंबर वन होईल. 5 वर्षात काँग्रेसने एक पाऊलही पुढे टाकले नाही, उलट 24 तास खुर्चीचा खेळ चालला: लाल डायरीबद्दल तुम्ही सर्वांनी ऐकले असेल. लाल डायरीमध्ये काँग्रेसच्या भ्रष्टाचाराचे प्रत्येक काळे कृत्य असल्याचे लोक म्हणतात. लाल डायरीची गुपिते उघड व्हावीत की नाही? स्कोअर सेटल करावा की नाही? अप्रामाणिक लोकांना शिक्षा झाली पाहिजे की नाही? काँग्रेस सरकार लाल डायरीचे रहस्य उघड होऊ देणार का?, सत्य बाहेर येईल का? हे सत्य बाहेर यायचे असेल तर भाजपचे सरकार आले पाहिजे.

भाजप सरकार राजस्थानमध्ये रोजगार आणणार : काँग्रेसच्या पेपर लीक माफियाने येथील लाखो तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त केले आहे. राजस्थानातील तरुण न्यायाची मागणी करत आहेत. निवडणुकीच्या वेळी बेरोजगारी भत्ता देण्याचे आश्वासन देणाऱ्या काँग्रेस सरकारने तरुणांना पेपर लीक माफियांच्या हाती सोपवले आहे. तुम्ही लक्षात ठेवा, भाजप येईल आणि रोजगार आणेल. पेपर माफियांचा मुकाबला करणार.

काँग्रेस नेत्यांचे पहिले आणि शेवटचे धोरण म्हणजे तुष्टीकरण : जिथे कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अशी असते तिथे व्यवसाय उद्ध्वस्त होतो. पण काँग्रेसला आपली व्होट बँक आवडते. मला तुम्हाला विचारायचे आहे, जोधपूर दंगलीत जळत असताना मुख्यमंत्री इथे काय करत होते? हिंसाचार होत असताना आणि निरपराधांचे बळी जात असताना काँग्रेसवाले काय करत होते?



### मध्यप्रदेशातही 12 हजार कोटींचे प्रकल्प

» राजस्थाननंतर, पीएम मोदी मध्य प्रदेशात 12,600 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील. हे प्रकल्प रस्ते, रेल्वे, गॅस पाइपलाइन, गृहनिर्माण आणि शुद्ध पिण्याचे पाणी यासारख्या क्षेत्रांशी संबंधित आहेत. इंदूरमध्ये लाइट हाऊस प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या 1,000 हून अधिक घरांचे ते उद्घाटन करणार आहेत.

# मणिपूरमध्ये पुन्हा उसळला हिंसाचार!

## » हल्लेखोरांनी 2 घरे जाळली: अनेक राउंड फायरिंग

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मणिपूरमध्ये बुधवारी पुन्हा एकदा हिंसाचार झाला. रात्री दहाच्या सुमारास हल्लेखोरांनी दोन घरांना आग लावली. परिसरात अनेक राऊंड गोळीबारी करण्यात आली. ही घटना न्यू किथेलमॅनबी येथील पाटसोई पोलीस स्टेशन परिसरात घडली. या घटनेनंतर हल्लेखोर पळून गेल्याचे पोलिसांनी सांगितले. यानंतर मैतेई समाजातील महिलांचा समूह घटनास्थळी जमा झाला. मात्र, सुरक्षा दलांनी महिलांना पुढे जाण्यापासून रोखून शांतता राखण्याचा प्रयत्न केला.**

जाळपोळीनंतर स्थानिक प्रशासन आणि अग्निशमन दलाने परिस्थिती नियंत्रणात आणल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आली आहे. जुलै महिन्यापासून बेपत्ता झालेल्या दोन मैतेई विद्यार्थ्यांच्या मृतदेहांची छायाचित्रे समोर आल्यानंतर सुमारे दोन आठवड्यांपूर्वी राज्यात हिंसाचार उसळला होता. बुधवारी (27 सप्टेंबर) राजधानी इंफाळसह अनेक ठिकाणी आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये हिंसक चकमक झाली.

या हिंसाचारात 50 जण जखमी झाले आहेत. त्यापैकी बहुतांश शालेय विद्यार्थी आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मणिपूर सरकारने ज्या भागात हिंसाचार झाला त्या भागांना 'शांततापूर्ण' घोषित करून त्यांना AFSPA पासून दूर ठेवले आहे. दुसऱ्या दिवशी, 28 सप्टेंबरच्या रात्री, मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांच्या लुवांगसांगबम, इम्फाळ पूर्व येथील खाजगी घरावर हल्लेखोरांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी हल्लेखोरांना मुख्यमंत्री निवासस्थानाच्या 500 मीटर आधी रोखले. पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून हल्लेखोरांना पांगवले. हल्ल्याच्या प्रयत्नानंतर मुख्यमंत्र्यांच्या घरावरील सुरक्षा वाढवण्यात आली होती.

यामध्ये 17 वर्षांचा हिजाम लिंथोईगंबी आणि 20 वर्षांचा फिजाम हेमजीत हे दोन विद्यार्थी बसलेले दिसत आहेत. या चित्रात विद्यार्थी पांढऱ्या टी-शर्टमध्ये आहे, तर हेमजीत चेक शर्टमध्ये आहे आणि बॅकपॅक हातात आहे. त्यांच्या मागे दोन बंदूकधारीही दिसत आहेत. या छायाचित्रात दोन्ही विद्यार्थ्यांचे मृतदेह झुडपात पडलेले दिसत आहेत. मात्र, हा फोटो मणिपूरमधील कोणत्या भागातील आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलीस आणि तपास यंत्रणा मृतदेहाचा शोध घेत आहेत.



### आतापर्यंत 180 जणांचा मृत्यू

» मणिपूरमध्ये गेल्या 4 महिन्यांपासून सुरू असलेल्या जातीय हिंसाचारात आतापर्यंत 180 जणांचा मृत्यू झाला आहे. तर 1100 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. एवढेच नव्हे तर जाळपोळीचे 5172 गुन्हे नोंदवण्यात आले असून त्यात 4786 घरे आणि 383 धार्मिक स्थळांची जाळपोळ आणि तोडफोड करण्यात आली आहे.

# राहुल गांधींना नव्या युगाचा रावण म्हटले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

भाजपने गुरुवारी आपल्या सोशल मीडियावर राहुल गांधींचा फोटो पोस्ट केला आणि त्यांना नव्या युगाचा रावण म्हटले. पक्षाने लिहिले- नव्या युगाचा रावण आला आहे. ते दुष्ट आहेत, धर्मविरुद्ध आहेत आणि रामाच्या विरोधात आहेत. देश नष्ट करणे हेच त्यांचे एकमेव ध्येय आहे. भाजपने आपल्या सोशल मीडिया हँडलवर जारी केलेल्या पोस्टरमध्ये राहुल गांधींना 7 डोकी दाखवण्यात आली आहेत. त्यावर लिहिले आहे- भारत खतरे में है. फोटोच्या खाली मोठ्या अक्षरात रावण लिहिले आहे. याच्या खाली इंग्रजीमध्ये जॉर्ज सोरोसद्वारे दिग्दर्शित काँग्रेस पार्टी प्रॉडक्शन लिहिले आहे. काँग्रेसच्या 'भारत जोडो यात्रे'मध्ये जॉर्ज सोरोस यांचे लोक सहभागी झाल्याचा आरोप भाजपने केला आहे. याशिवाय भाजप नेत्यांनी 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' या स्वयंसेवी संस्थेचे नाव घेतले आहे. या एनजीओला जॉर्ज सोरोस यांनी निधी दिल्याचा दावा भाजपच्या नेत्यांनी केला आहे आणि काँग्रेसचे उपाध्यक्ष सलील शेट्टी हे काँग्रेसच्या 'भारत जोडो यात्रे'मध्ये सहभागी झाले होते. भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांनी सोशल मीडियावर एक फोटो पोस्ट केला ज्यामध्ये सलील शेट्टी भारत जोडो यात्रेत राहुल गांधींसोबत दिसत आहेत. याशिवाय भाजपचे आणखी एक प्रवक्ते शेहजाद पूनावाला यांनी त्याच तारखेला एक व्हिडिओ पोस्ट केला ज्यामध्ये प्रवीण चक्रवर्ती यांच्या नावाचा उल्लेख होता. चक्रवर्ती यांनाही मोदीविरोधी मानले जाते. वास्तविक, 28 जून रोजी स्मृती इराणी यांनी पत्रकार परिषद घेतली होती. स्मृती म्हणाल्या होत्या- राहुल गांधी यांनी त्यांच्या अमेरिका दौऱ्यात जॉर्ज सोरोस यांच्या जवळच्या लोकांना भेटले होते. त्यांच्या भेटीदरम्यान भारतीय प्रवासींसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात इस्लामिक सर्कल ऑफ नॉर्थ अमेरिकेच्या तनझीम अन्सारी यांच्या सहभागाबद्दल त्यांनी गांधींवर हल्ला केला.

# जॅकलीनच्या फोटोवर कमेंट..!



सुकेशने प्रसिद्ध गायक-संगीतकार मिका सिंगला जॅकलिनच्या इंस्टाग्राम फोटोवर कमेंट केल्याबद्दल कायदेशीर नोटीस पाठवली आहे. त्यामुळे सर्वांना धक्का बसलाय. सुकेश हा जॅकलीनचा कथित प्रियकर म्हणून ओळखला जातो. तो कधी जेलमधून तिला लव्ह लेटर देतो. तर कधी तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करत असतो. आता सुकेशने थेट गायक मिका सिंगला जॅकलीनच्या फोटोखाली कमेंट केल्याने कायदेशीर नोटीस पाठवली आहे. तुरुंगात असलेल्या सुकेश चंद्रशेखरने मिका सिंगला इशारा दिला असून कायदेशीर नोटीसही पाठवली आहे. सुकेशचे वकील अनंत मलिक यांनी नोटीसमध्ये म्हटले आहे की, 'तुमच्या वक्तव्यामुळे आमच्या क्लायंटच्या चारित्र्याबद्दल आणि व्यक्तिमत्त्वाबद्दल व्यापक चर्चा सुरू झाली आहे, ज्यामुळे त्यांना मीडियाच्या प्रश्नांना सामोरे जावे लागले आहे. ही परिस्थिती त्यांचे संकट वाढवत आहे आणि सतत मीडिया ट्रायलमुळे महत्त्वपूर्ण आव्हाने निर्माण करत आहे. "आमचा क्लायंट एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्व आहे. आणि त्यांचं भारतीय चित्रपट उद्योग, विविध व्यावसायिक घराणे आणि राजकीय वर्तुळात मानाचं स्थान आहे. त्याला राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर प्रतिष्ठा आहे. मिका सिंग स्वतः बॉलीवूड इंडस्ट्रीचे सदस्य असल्याने, या क्षेत्रात नाव कमवण्यासाठी किती संघर्ष करावा लागतो हे त्यांना चांगलेच माहीत आहे.

# हिना खानला ईडीचा समन्स!

ऑनलाइन बेटिंग ॲप प्रकरणात कॉमेडियन कपिल शर्मा, अभिनेत्री हुमा कुरेशी आणि हिना खान यांना ईडीने समन्स पाठवले आहे. पीटीआयने ही माहिती दिली आहे. या दोघांना कधी बोलावण्यात आले याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्याचवेळी, अभिनेता रणबीर कपूरने अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) ई-मेल पाठवून हजर राहण्यासाठी एक आठवड्याचा वेळ मागितला आहे. रणबीर शुक्रवार 6 ऑक्टोबर रोजी रायपूर येथील ईडी कार्यालयात हजर होणार होता. ईडी रायपूरचे वकील सौरभ पांडे यांनी सांगितले की, रणबीरला 6 नव्हे तर 5 ऑक्टोबरला हजर व्हायचे होते, मात्र तो आला नाही. सायंकाळी 5 वाजेपर्यंत अधिकारी त्यांची वाट पाहत होते. त्याचा ईमेल आल्यानंतर आता त्याला दुसरा समन्स कोणत्या तारखेला पाठवायचे याचा निर्णय शुक्रवारी होणार आहे. रणबीरवर सौरभ चंद्राकरच्या बेटिंग ॲपची जाहिरात केल्याचा आरोप आहे. यासाठी हवालाद्वारे रणबीरला रोख रक्कम देण्यात आली होती, असे ईडीचे म्हणणे आहे. ईडीला अभिनेत्याकडून जाणून घ्यायचे आहे की, तो कधीपासून त्याची जाहिरात करत आहे? यासाठी कोणी संपर्क साधला आणि कोणत्या पद्धतीने पैसे मिळाले. रणबीर या प्रकरणात आरोपी नसल्याचा दावा काही मीडिया रिपोर्ट्समध्ये करण्यात आला आहे. ईडीला फक्त ते समजून घ्यायचे आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी सौरभ चंद्राकर आहे, ज्याच्या लग्नाला टायगर श्रॉफ, नुसरत भरुचा, सुखविंदर सिंग, नेहा कक्कर आणि सनी लिओनसह 14-15 सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. ईडी या सर्वांना समन्स पाठवू शकते.





# 'मेरा पिया घर आया'वर सनी थिरकणार

सध्या अनेक जुन्या गाजलेल्या गाण्यांचे रिमेक निघत आहेत. आगामी आँख मिचोली सिनेमात तुनूक तुनूक टू तारारा या दलेर मेहंदींच्या गाजलेल्या गाण्याचा रिमेक पाहायला मिळणार आहे. इतकंच नव्हे तर याआधी ये मेरा दिल, लैला मे लैला अशा गाण्यांचा रिमेक बघायला मिळाला आहे. अशातच याराना सिनेमातील माधूरी दिक्षीतच्या गाजलेल्या मेरा पिया घर आया या गाण्याचा रिमेक भेटीला येणार आहे. सनी लिओनी या रिमेकवर थिरकणार आहे. अभिनेत्री सनी लिओनी सध्या अनेक कारणांसाठी चर्चेत असताना ती आता या अफलातून गाण्याच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.बॉलीवूडच्या रसिकांना सनी लिओनीचा एक रोमांचक आणि आनंददायक परफॉर्मन्स बघायला मिळणार असून जेव्हा, माधुरी दीक्षितने एकेकाळी गाजवलेला प्रसिद्ध डान्स नंबर पुन्हा तयार करण्यासाठी सनी लिओनी तयार झाली आहे. खूप अपेक्षेनंतर आता गाण्याचा टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे हे गाणे 8 ऑक्टोबर रोजी रिलीज होत आहे. "मेरा पिया घर आया" गाण्याची झलक इतकी जबरदस्त आहे तर गाणं नक्कीच भारी असेल. हे मूळ गाणं 1995 च्या ब्लॉकबस्टर चित्रपट यारानामध्ये प्रदर्शित केले गेले होते. ज्याला बॉलीवूडच्या चाहत्यांनी खूप प्रेम दिलं. आता हे गुपित उघड झाले आहे की माधुरी आणि सनी या दोघांच्याही चाहत्यांसाठी हा नॉस्टॅल्जिया ठरणार आहे." मेरा पिया घर आया 2.0" या प्रतिष्ठित गाण्यात सनी लिओनी तिच्या अप्रतिम नृत्य सादरीकरणाने चाहत्यांना मोहित करणार आहे. प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक विजय गांगुली यांनी हा डान्स कोरिओग्राफ केला आहे.



# केतकी चितळे काय बोलून गेली!

केतकी चितळे ही मराठी मनोरंजन विश्वातील चर्चेतील अभिनेत्री. केतकी कायम राजकीय आणि सामाजिक घडामोडींवर भाष्य करत असते. नांदेड येथील शासकीय रुग्णालयात रुग्ण व नवजात बालके दगावल्यानंतर खासदार हेमंत पाटील यांनी रुग्णालयाचे अधिष्ठातांना स्वच्छतागृह साफ करायला लावले. या घटनेवर केतकीने सोशल मिडीयावर निषेध नोंदवलाय. नांदेड येथे घडलेल्या घटनेचा निषेध करत केतकी लिहीते, "आता एका हॉस्पिटल डीनला, हॉस्पिटलमधील संडास साफ करा हे ही त्याची जात बघून सांगायचे तर!!! आणि तरीही राव आपल्याकडे खोट्या अट्रोसिटी केसेस टाकल्या जात नाहीत. जय हो ATROCITIES ACT, 1989. आम्ही सामान्य माणसांवर काय, तर आता कुठल्या पदालाही नाही सोडणार." नांदेडच्या शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या मृत्यूनंतर राज्यभरात या घटनेचे पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले. या घटनेवरून राजकारण पेटलं असून विरोधकांकडून राज्य सरकारवर हल्लाबोल केला जात आहे. यादरम्यान शिंदे गटाचे खासदार हेमंत पाटील यांनी काल या रुग्णालयाला भेट दिली. या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला. यानंतर आता खासदार हेमंत पाटील यांच्याविरोधात अॅट्रोसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इंग्लंडला न्यूझीलंडकडून धोबीपछाड!

## » अष्टपैलू खेळाडू रवींद्रने न्यूझीलंडसाठी रचला इतिहास

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून इंग्लंडला फलंदाजीसाठी आमंत्रित केले. इंग्लंड संघाने 50 षटकांत 9 बाद 282 धावा केल्या. 283 धावांचे लक्ष्य न्यूझीलंडच्या अव्वल-3 फलंदाजांनी 36.2 षटकांत पूर्ण केले. संघाने एक विकेट गमावून सामना जिंकला. डेव्हॉन कॉनवे आणि रचिन रवींद्र यांनी नाबाद शतके झळकावली. दोघांमध्ये 273 धावांची विक्रमी भागीदारी झाली.**



न्यूझीलंड संघाने सलामीच्या सामन्याच्या पहिल्या चेंडूपासूनच वर्चस्व गाजवले. किवी फिरकीपटूंनी प्रथम ब्रिटीशांना अडचणीत आणले. उरलेले टास्क डेव्हॉन कॉनवे आणि रचिन रवींद्र या सलामीवीरांनी पूर्ण केले. किंवा आपण असे म्हणू शकतो की गतविजेता संघ न्यूझीलंडच्या डेव्हॉन कॉनवे आणि रचिन रवींद्र या दोन फलंदाजांकडून पराभूत झाला.

वास्तविक, 283 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या किवी संघाने 10 धावांवर पहिली विकेट (विल यंग 0 धावा) गमावली. त्यानंतर कमी धावसंख्येचा सामना रोमहर्षक होईल असे वाटत होते, परंतु कॉनवे आणि रवींद्र यांच्यातील 273 धावांच्या भागीदारीने इंग्लंड संघांची धावसंख्या खिळखिळी केली.

यापूर्वी न्यूझीलंडचे फिरकीपटू प्रभावी होते. 9 पैकी 5 विकेट फक्त फिरकी गोलंदाजांनी घेतल्या. उर्वरित चार विकेट वेगवान गोलंदाजांच्या वाट्याला गेल्या. ग्लेन फिलिप्स आणि मिचेल सॅटनरने प्रत्येकी दोन गडी बाद केले. पार्टटाइमर रचिन रवींद्रला एक विकेट मिळाली. मध्यमगती गोलंदाज मॅट हेन्रीला 3 यश मिळाले. जो रूट (77 धावा) आणि कर्णधार जोस बटलर (43 धावा) यांच्याशिवाय इतर कोणताही फलंदाज इंग्लंडसाठी मोठी खेळी खेळू शकला नाही. 10 धावांत पहिली विकेट गमावल्यानंतर डेव्हन कॉनवे आणि रचिन रवींद्र या जोडीने न्यूझीलंडला सावरले. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी 200+ धावांची भागीदारी केली. न्यूझीलंडच्या डावाला चांगली सुरुवात झाली. कॉनवेंन जोरदार शतक ठोकले आहे. यंदाच्य वर्ल्डकपमध्ये कॉनवेच्या बॅटमधून शतकाची सुरुवात झाली. रचिन रविंद्र याने देखील कॉनवे पाठोपाठ शतक ठोकले. न्यूझीलंडचा फलंदाज विल यंग गोल्डन डक बाद झाला. पहिल्याच चेंडूवर सॅम करनच्या चेंडूवर यष्टीरक्षक कर्णधार जोस बटलरने उत्तम झेल घेत यंगला बाद केले. जो रूट आणि कर्णधार जोस बटलर यांनी चांगली भागिदारी केली. जो रूटने एकदिवसीय कारकिर्दीतील 37वे अर्धशतक पूर्ण केले. त्या जोरावर इंग्लंडने ही मजल मारली. सर्वच फलंदाजांनी योगदान देत ही धावसंख्या उभारली. मोईन अली 11 धावा करून बाद झाला. त्याला ग्लेन फिलिप्सने बोल्ड केले. तत्पूर्वी, हॅरी ब्रूक 25 धावा करून बाद झाला, जॉनी बेअरस्टो 33 धावा करून बाद झाला आणि डेव्हिड मलान 14 धावा करून बाद झाला. मॅट हेन्री, मिशेल सँटनर आणि रचिन रवींद्र यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतली. रूट आणि बटलर यांनी चांगल्या रितीने डाव सावरला पण मॅट हेन्रीने बटलरला 43 धावांवर बाद करत ही भागिदारी मोडली.

त्यानंतर आलेल्या लिव्हिंगस्टोनलाही बोल्टने माघारी परतवले. त्यामुळे 39 ओव्हरमध्ये इंग्लंडची अवस्था 6 बाद 221 अशी झाली होती. रूटने मात्र एक बाजू लावून धरली. मात्र 42 व्या ओव्हरमध्ये फिलप्सने जो रूटला 77 धावांवर असताना बोल्ड केले आणि त्याचे शतक हुकले. रिव्हर्स स्वीप मारण्याच्या प्रयत्नात रूट बाद झाला, त्यामुळे इंग्लंडचा संघ अडचणीत आला आहे. त्यानंतर क्रिस वोक्स आणि सॅम करन यांनी काही वेळ धावा केल्या मात्र वोक्स फार वेळ मैदानावर टिकला नाही. त्याला मिशेल सँटनरने बाद केले. त्यानंतर पुढच्याच ओव्हरमध्ये मॅट हेन्रीने सॅम करनलाही बाद केले.

### रचिन रवींद्र भारताशी कनेक्शन

» न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू रचिन रवींद्र भारतीय वंशाचा असून त्याची 'रचीन' या नावाची गोष्ट अनोखी आहे. भारताचे माजी कर्णधार आणि भारतीय संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या नावातील 'र' आणि मास्टरब्लास्टर फलंदाज सचिन तेंडुलकर यांच्या नावातील 'चिन' असं एकत्र करुन 'रचीन' हे नाव ठेवण्यात आलं आहे. रवींद्रचे बाबा रवी कृष्णमूर्ती हे बंगळुरूचे असून ते नव्वदीच्या दशकात न्यूझीलंडला रवाना झाले. न्यूझीलंडमध्ये ते हट हॉक्स क्लब चालवतात. या क्लबतर्फे भारतात दरवर्षी काही खेळाडू येतात. हैदराबाद, बंगळुरू, चेन्नई अशा विविध भारतीय शहरांमध्ये खेळण्याचा सराव व्हावा म्हणून हे खेळाडू येत असतात. रवींद्र २०११ पासून सातत्याने भारतात येतो आहे.

# भारतीय तिरंदाजांचा सुवर्ण लक्ष्यभेद!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

भारताच्या महिला कंपाउंड तिरंदाजी संघाने गुरुवारी आशियाई क्रीडा स्पर्धेत अंतिम फेरीत चायनीज तैपेईचा २३०-२२९ असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. यासह भारतीय तिरंदाजांनी आशियाई क्रीडा स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी केली आहे. भारतीय महिला तिरंदाजी संघाने रोमहर्षक फायनलमध्ये तैवानचा अवघ्या एका गुणाने पराभव केला आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीमध्ये दुसरे सुवर्णपदक जिंकले. गतविजेत्या आणि अव्वल मानांकित ज्योती सुरेखा वेन्नम, आदिती स्वामी आणि प्रनीत कौर या त्रिकुटाने अंतिम फेरीत चमकदार कामगिरी केली. त्यांनी शेवटच्या फेरीत ६० पैकी अचूक ६० गुण मिळवले आणि २३०-२२९च्या अंतिम स्कोअरसह तिसऱ्या सीडेड तैवान संघाला थोड्या फरकाने पराभूत करण्यात यश मिळविले. या विजयामुळे तिरंदाजीतील त्याचे हे पाचवे पदक निश्चित झाले. ज्योती आणि ओजस देवतळे यांच्या कंपाऊंड मिश्र सांघिक स्पर्धेत विजयानंतर २०२३च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे हे दुसरे सुवर्णपदक आहे. यासह भारताच्या तिरंदाजांनी पाच पदके मिळवून आशियाई क्रीडा स्पर्धेत आपले अस्तित्व मजबूत केले आहे. भारतीय तिरंदाजांनी इंचॉन २०१४ मधील त्यांच्या मागील सर्वोत्तम कामगिरीला मागे टाकले आहे, जिथे त्यांनी एक सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य पदक जिंकले होते.

# पाकिस्तान संघाची मोठी ताकद!

## » पाकिस्तान संघाची ताकद वेगवान गोलंदाजी

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बाबर आझमच्या नेतृत्वाखाली, पाकिस्तान क्रिकेट संघ २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी पूर्णपणे तयार आहे. पाकिस्तानचा संघ ६ ऑक्टोबर रोजी नेदरलँड्सविरुद्ध पहिला साखळी सामना खेळणार आहे. हा सामना हैदराबादमध्ये खेळला जाणार असून या सामन्यापूर्वी पाकिस्तान संघाचा कर्णधार बाबर आझम याने संघाची तयारी आणि ताकद याबद्दल सांगितले. बाबर आझमने आपल्या संघाची सर्वात मोठी ताकद काय आहे आणि त्याला काय करायचे आहे हे सांगितले.**



पाकिस्तान क्रिकेटने आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये बाबर आझम म्हणाला, 'आमचा सराव खुप चांगला झाला असून आम्ही आमचे सर्वोत्तम देण्याचा आमची ताकद फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही आहे, ज्यात आमचे फलंदाज चांगली कामगिरी करत आहेत. तसेच आमच्या संघाची सर्वात मोठी ताकद वेगवान गोलंदाजी आहे, परंतु आमचे फिरकीपटू देखील कमी नाहीत. आम्ही हा विश्वचषक भारतात खेळत आहोत आणि आम्ही पाहिले आहे की मधल्या षटकांमध्ये फिरकीपटू विकेट्स घेत आहेत, त्यामुळे ते खूप चांगले आहे. खेळपट्टीबद्दल बोलताना बाबर आझम म्हणाला की, 'येथील खेळपट्टी खूप चांगली आहे जिथे धावा होण्याची शक्यता आहे. येथे धावा काढण्यासाठी तुम्हाला खेळपट्टीवर थोडा वेळ घालवावा लागेल. त्यामुळे सेट होणे खूप महत्वाचे आहे कारण त्यानंतर तुम्हाला फलंदाजी करणे खूप सोपे जाते. येथे गोलंदाजीमध्ये फरक नाही आणि तुम्हाला येथे विकेट टू विकेट बॉलिंग करावी लागेल आणि तेही भिन्नतेसह. जर तुम्ही स्टंपच्या बाहेर थोडेसे असाल तर फलंदाज तुमच्यावर वर्चस्व गाजवतात.' आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२३ कॅप्टन डे कार्यक्रमात बोलताना बाबर आझम म्हणाले की, 'भारतात आमच्यावर कोणतेही दडपण नाही. इथली खेळपट्टी आणि परिस्थिती पाकिस्तान किंवा आशियातील परिस्थितीसारखीच आहे.